MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



ओबीसी आरक्षण बचाव यात्रेदरम्यान महापूर जि. लातूर येथे रस्त्यात भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे व वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची भेट झाली. आ. पंकजाताई यांनी या यात्रेला शुभेच्छा दिल्या. लातूर येथे आयोजित भाजपच्या मराठवाडा विभागाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी आ. पंकजाताई लातूरकडे जाताना ही भेट झाली.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३०७ | मंगळवार दि.३० जुलै २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -307 | TUESDAY DT. 30 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# चमच्याने माती खाणाऱ्या पीआय मुदीराज, पो.कॉ.उगलेवर पोलीस अधीक्षक कारवाई करणार का?

## सामूहिक बलात्कार प्रकरण दडपणारे पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज , रमेश उबाळे, हनुमंत उगलेवर एसपी नंदकुमार ठाकूर कारवाई करणार का?

## नशामुक्ती अभियानाचे नुसतेच कागदोपत्री अभियान नको, प्रत्यक्षात कारवाई हवी!

## गांधीनगर बीट मधून माया गोळा करून देणारा उगले सगळ्यांचाच लाडका का?

- एस पी साहेब गांधीनगर च्या बीडमध्ये एकदा तुम्ही एन्ट्री माराच उगले चे कारणाने तुमच्या नजरेसमोर येतील.
- गांधीनगर च्या बीडमध्ये अनेक दोन नंबरचे धंदे गुटखा मटका वाळू मुरूम माफिया अवैध हातभट्टी, केमिकल द्वारे बनवली जाणारी शिंदीचे अंडे पोलीस निरीक्षक अशोक मंदिरात उगलेच्या आशीर्वादाने जोरात चालू?
- एसपी नंदकुमार ठाकूर साहेब हनुमंत उगले ला गांधीनगरच्या बीडमध्ये ठेवणाऱ्या पोलीस निरीक्षकांसह कथित लैंगिक अत्याचारातील पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज, फौजदार रमेश उबाळे, पोलीस कर्मचारी हनुमंत उगले त्यांच्यावर कारवाई करणार का?
- एवढे मोठे प्रकरण दडपण्याचे पाप करणाऱ्या हनुमंत उगलेला गांधीनगरची मोठी भेट देण्याची जबाबदारी पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांचीच का?
- दैनिक महाराष्ट्र आरंभच्या बातम्याच्या दणक्याने संबंधित प्रकरणाला वाचा फुटली सुट्टीवर गेलेले पीआय अशोक मुदिराज यांना तात्काळ हजर होण्याचे पोलिस अधीक्षकांनी का दिले? संबंधीत प्रकरण घटना घडल्यांनतर मुंदीराज हे अचानक रजेवर का गेले याचाही खुलासा त्यांनी द्यावा कारण गंभीर गुन्हा घडल्यानंतर जबाबदारी झटकुन स्वतः वाचण्यासाठी रजेवर गेल्याची चर्चा पेठ बीड पोलीस ठाण्याच्या तोंडी ऐकायला मिळत होती?





**पेठ बीड पोलीस ठाण्यातल्या हद्दीत कथित सामूहिक लैंगिक बलात्कार प्रकरणांमध्ये अनेक चुका पोलिसांकडून झालेल्या या चुका फक्त संबंधित फिर्यादी असलेला व गुन्हेगारांना पाठीशी घालणारा तसेच दोन नंबरच्या धंदेवाल्यांना पोसणारा माफीयांच्या पाठीशी सदैव उभा राहणारा सर्वात जास्त माफीयाच्या संपर्कात राहणारा स्वतःच्या गांधीनगर मधील अमलदारच्या बीट मधील भागात अनेक दोन नंबरचे धंदे उभारणारा व वाळू मुरूम दगड गुटखा मटका हातभट्टी दारूचे अंडे बोगस प्रकारे केमिकलद्वारे बनवलेली शिंदी त्याचे क्लब सह चोर चक्क्यांना पाठीशी घालणारा पोलीस कर्मचारी हनुमंत उगले हा गांधीनगर बीडचा बिट अमलदार असून याचा पालन करता कोण आहे वरिष्ठांना याच्याकडून हप्ता जातो का ते वरिष्ठ कोण आहेत हे पुढील अंकांमध्ये वाचायला मिळणार आहे यामध्ये मात्र गांधिनगर मध्ये मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाज व इतर अठरापगड हिंदू समाज बांधव राहत असताना यामध्ये मोठा अनुसूचित प्रकार घडण्याची दाट शक्यता आहे.**

जर गांधीनगर भागामध्ये अनुसूचित प्रकार घडला तर या ठिकाणी फक्त आणि फक्त ठाण्याचे अशोक मुदिराज हनुमंत उगले हेच जबाबदार राहतील एवढं मात्र नक्की आहे? कारण पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज हे मात्र सध्याच्या परिस्थितीमध्ये उगले च्या पाठीशी खंबीरपणे उभा असताना हनुमंत उगलेला कोणीही हात लावू शकत नाही किंवा कारवाई होऊ शकत नाही असे ठामपणे हनुमंत उगले गांधीनगरच्या बीटमध्ये उभा राहून लोकांना सांगत आहे कारण उगले पोलीस सांगतो की मीच पेठ बीड पोलीस ठाण्यात चालवत आहे माझ्यावरती सर्व मदार आहे वरिष्ठ अधिकारी माणसांना वरिष्ठांना सर्व पुरवठा करण्याची जबाबदारी माझ्याकडे असल्याची चर्चाही गांधीनगर भागातील बीट अमलदार हनुमंत उगले वादग्रस्त पोलीस कर्मचारी याची असल्यामुळे त्या ठिकाणी नागरिकांकडून ऐकायला मिळत आहे. व उगले या सर्व नागरिकांना आपल्या दहशतीमध्ये घेत आहे. हनुमंत उगले वरती पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर कारवाई करतील का अशी चर्चाही यावेळी शहरातील नागरिकांकडून ऐकायला मिळत आहे कारण हनुमंत उगलेने संबंधित प्रकरण हे सुरुवातीपासून दडवून ठेवल्यामुळे हनुमंत उगले हा पण त्या नराधम आरोपी एवढाच गुन्हेगार असल्याची चर्चाही यावेळी बीड जिल्ह्यातील नागरिकांकडून ऐकायला मिळत आहे. पेठ बीड विभागातील बार्शी नाका परिसरात पेठ बीड पोलिसांच्या विरोधामध्ये पोलिसांच्या नाकर्त्यामुळे लोकात तीव्र संताप?

बीड (प्रतिनिधी)

कथित सामूहिक लैंगिक अत्याचार प्रकरणांमध्ये फिर्यादी असलेला पोलीस कर्मचारी हनुमंत उगले च्या फिर्यादीमध्ये अज्ञात आरोपींच्या विरोधामध्ये तक्रार दाखल करण्यात आलेले आहे परंतु या तक्रारीमध्ये न्याय मिळेल अशी अपेक्षा यावेळी बीडच्या जनतेला नाही संबंधित पीडित बोळसर मुलीच्या एकूण सर्व चौकशीची माहिती घेण्यासाठी पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज यांना फोन केला असता त्यांनी संबंधित लोकांना माहिती देण्यास टाळा करणे तसेच या प्रकरणांमध्ये ज्याचे फोन येतील त्याचे फोन ब्लॅक लिस्टमध्ये टाकून गप्प बसणे या प्रकरणांमध्ये या अगोदरच खूप उशीर होऊन संबंधित प्रकरण हे दैनिक महाराष्ट्र आरंभ ने उचलून धरल्यामुळे या प्रकरणाला वाचा फुटलेले असताना मात्र सुट्टीवर गेलेले पेठ बीड ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांना पोलीस अधीक्षक यांनी तात्काळ पेठ बीड पोलीस स्टेशनला हजर होण्याचे आदेश दिल्यामुळे ते दैनिक महाराष्ट्र आरंभच्या दणका त्यांना बसला आणि त्या दणक्याने ते पेठ बीड पोलीस स्टेशनला येऊन हजर झाले व संबंधित तपासाला बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिन पांडकर बीडचे डी वाय एस पी विश्वंभर गोल्डे यांनी खरी तपासाची चक्र फिरवत पीडीतील न्याय देण्याचे काम केले आहे. त्यामुळे आज सुद्धा एसपी नंदकुमार ठाकूर अतिरिक्त सचिन पांडकर विश्वंभर गोल्डे यांनी बीड शहरामध्ये कौतुक होत असताना मात्र पेठ बीड ठाण्यामध्ये अनेक दोन नंबरचे धंदे चालू आहेत. यामध्ये दोन नंबरच्या धंद्यावाल्यांना पोसण्यासाठीच हनुमंत उगले सारखा पोलीस कर्मचारी पेठ बीड पोलीस ठाण्याचे पि आय अशोक मुदिराजांनी हनुमंत उगलेला पाळलेल आहे.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाने माजलगाव मतदार संघाची उमेदवारी नारायणराव डक यांना द्यावी - ॲड भास्कर उजगरे

माजलगाव (प्रतिनिधी)

बीड जिल्हा शरदचंद्र पवार साहेबांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात आहे याचं ज्वलंत उदाहरण बजरंग बप्पा सोनवणे यांना बीड जिल्ह्याचा खासदार म्हणून निवडून दिले त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मानणारा खूप मोठा वर्ग आहे. माजलगाव मतदार संघात २०१९ साल च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस,महाविकास आघाडीच्या आ. प्रकाश सोळंके यांना माजलगाव मतदार संघातील जनतेने शरदचंद्रजी पवार साहेब आणि पुरोगामी विचाराचे प्रतिनिधी म्हणून विजयी केले परंतु त्यानंतर आ. प्रकाश सोळंके यांनी अवध्या काही तासात पहाटेच्या शपथविधीला पाठिंबा दर्शवून भारतीय जनता पक्षाला सहकार्य करण्याची भूमिका घेऊन माजलगाव मतदार संघातील जनतेचा विश्वासघात केला होता, पुढे ईडीच्या भीतीमुळे अजित पवार यांनी भाजप सोबत जाण्याचा घेतलेल्या निर्णयाला संमती दर्शवत आ. प्रकाश सोळंके हे भाजप सोबत गेलेल्या राष्ट्रवादीच्या गटात ईडीच्या भीतीपोटी सामील झाले, केवळ सत्तेचा माग धरून काम करणाऱ्या आमदार प्रकाश सोळंके यांनी माजलगाव मतदार संघातील जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून जनतेला निष्ठावंत कार्यकर्ते यांना वाऱ्यावर सोडण्याचे पाप केले, परंतु माजलगाव मतदार संघात शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नावर निष्ठावंत कार्यकर्ते यांनी आपल्या आंदोलने करून प्रशासनासह शासनाला धारेवर धरत शेतकऱ्यांना न्याय व गोरगरीब निराधार यांना मिळवून देत, शेतकऱ्यांची खते बी होणारी लूट, प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांकडून होणारी लूट,व शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान वेळेवर मिळावे व शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये आणि गोरगरीब लोकांकडून विहीरी,घरकुल या मध्ये होणारी लूट थांबवण्याचे काम निष्ठावंत कार्यकर्ते यांनी केले आहे. त्यामुळे माजलगाव विधानसभेचा आश्वासक चेहरा,व राजकीय धब्बा नसलेला चेहरा म्हणून जनसामान्यात, शेतकऱ्यांमध्ये त्यांची चांगली प्रतिमा असून सत्तेसाठी नाही तर सत्यासाठी लढणारे धडाडीचे नेते म्हणून त्यांची ओळख सबंध मतदार संघात आहे, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अनेक प्रस्थापित राजकीय नेते विविध राजकीय पक्षाची उंबरठे झिजवत असताना प्रमाणिकपणे चळवळीत काम करणारा, धाडसी कार्यकर्ता म्हणून नारायणराव आण्णा डक यांची वेगळी ओळख आहे, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत माजलगाव मतदार संघातील सर्व प्रस्थापित पुढारी भाजपच्या बाजूने असताना, महाविकास आघाडीच्या खा. बजरंग बप्पा सोनवणे यांना माजलगाव मतदार संघातून चांगले मताधिक्य मिळवून देण्यासाठी गावा गावात-वाडी वस्तीत जाऊन केंद्र शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा पर्दाफाश करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, तसेच आगामी काळात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी तसेच माजलगाव मतदार संघातील शेकडो प्रलंबित प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी नारायणराव डक यांच्यासारख्या तडफदार, प्रमाणिक



नेतृत्वाची गरज आहे त्यामूळे मा. शरदचंद्रजी पवार साहेब,जयंतराव पाटील साहेब यांनी नारायणराव डक यांच्यासारख्या शेतकरी कुटुंबातील लढवय्या नेत्यास माजलगाव विधानसभेची उमेदवारी द्यावी असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे ड भास्कर उजगरे यांनी केले आहे

# वडवणी येथे आरक्षण बचाव यात्रेनिमित्त ॲड.प्रकाश आंबेडकर साधणार संवाद

**वडवणी /प्रतिनिधी**

**ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू नये यासाठी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर हे आरक्षण बचाव यात्रेनिमित्त दि.१ऑगस्ट २०२४गुरुवार रोजी सकाळी १०:३०वा. छत्रपती शिवाजी महाराज चौक वडवणी येथे येणार असून ते आरक्षण विषयी बहुजन समाजातील समाज बांधवाशी संवाद साधणार आहेत तरी आरक्षणधारी बहुजन समाजाने हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नाभिक समाजाचे युवा नेते संतोष भैय्या बहिरे यांनी केले आहे.**



**आरक्षणधारी बहुजन समाजाने हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे:- संतोष बहिरे**

गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रात आरक्षणाच्या मुद्यावरून चांगलेच वातावरण तापलेले आहे ओबीसी समाज म्हणतो कोणी आपल्यात घुसखोरी करु नये तर मराठा समाज म्हणतो आम्हाला ओबीसीतुनच आरक्षण द्या या दोन्ही मुद्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक शितयुध्द पेटल्याचे वातावरण आहे. हे शितयुध्द थांबवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्रभर आरक्षण बचाव यात्रेला सुरुवात केली आहे.ही यात्रा दि.१ ऑगस्ट गुरुवार रोजी वडवणी येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात येणार आहेत तरी सर्व आरक्षणधारी बहुजन समाजाने हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नाभिक समाजाचे युवा नेते संतोष भैय्या बहिरे यांनी केले आहे.



सेंट्रल बँक ऑफ सिरसमार्ग येथे गोविंद भरोसे कृषी अधिकारी म्हणून रुजू झाले,असताना त्यांचा जीओ जिंदगी टीमच्या वतीने सत्कार करण्यात आला.या वेळी मॅनेजर वैभव कूटे,स्वप्नील जोशी,बालाजी बोबडे,शिवाजी टकले,पत्रकार रोहित लंबे,नागेश रडे,बाळासाहेब चिखले,ग्रा प सदस लक्ष्मण कोळेकर,शंकर लंबे, इंदर पवळ,कृष्णा टाकसाळ संचार उमाप उपस्थित होते..

# आ. पंकजाताई मुंडेंचं जिल्ह्यात दिमाखदार एन्ट्रीने अनोखं सोशल इंजिनिअरिंग

## धाकट्या पंढरीत फटाक्यांची आतिषबाजी ; बीडमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना क्रेनवरून पुष्पवृष्टी

बीड (प्रतिनिधी)

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांचं विधानपरिषदेच्या आमदार झाल्यानंतर पहिल्यांदाच बीड व परळी शहरात आगमन झालं, त्यांनी हार तुरे नाकारले असले तरी त्यांचं जिल्ह्यात दिमाखदार स्वागत झालं. धाकटी पंढरी श्रीक्षेत्र नारायणगडावर फटाक्यांच्या आतिषबाजीत जोरदार स्वागत करण्यात आलं. बीड शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर त्यांनी पुष्पवृष्टी केली. गोपीनाथ गडावर पित्याच्या चरणी त्या नतमस्तक झाल्या तर परळीत डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास त्यांनी वंदन केले. एकूणच जिल्ह्यात दिमाखदार एन्ट्रीने त्यांनी केलेल्या सोशल इंजिनिअरिंगचं कौतुक होत आहे.

आ. पंकजाताई मुंडे यांनी सकाळी भगवान भक्तीगडावर राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या स्मारकाचे दर्शन घेऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला, त्यानंतर त्यांनी थेट धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगडावर जावून संत नगद नारायण महाराजांचे आशीर्वाद घेतले. याठिकाणी गडाचे महंत शिवाजी महाराज यांची भेट घेऊन त्यांचेही आशीर्वाद घेतले. याठिकाणी आगमन होताच प्रवेशद्वारावर त्यांचं फटाक्यांची आतिषबाजी करून स्वागत झालं. तत्पूर्वी नवगण राजूरी येथील गणपतीचे त्यांनी दर्शन घेतले.

बीडमध्ये छत्रपतींच्या पुतळ्यावर क्रेनने पुष्पवृष्टी

पंकजाताई मुंडे यांची बीड शहरात जोरदार एन्ट्री झाली. कार्यकर्त्यांनी वाजतगाजत त्यांचं भव्य स्वागत केलं. छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास त्यांनी स्वतः क्रेनच्या बास्केटमधे चढून पुष्पवृष्टी करत अभिवादन केले. भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बीडहून परळीकडे जाताना रस्त्यात वडवणी, तेलगाव, दिंद्रुड, सिरसाळा येथे कार्यकर्त्यांनी त्यांचं स्वागत केलं. गोपीनाथ गडावर आल्यावर पंकजाताईंनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून दर्शन घेतलं. परळीत येताच रेल्वे स्टेशन परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांनी वंदन केलं. छत्रपती शिवाजी महाराज चौकात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने त्यांचं वाजतगाजत, फटाक्यांच्या आतिषबाजीत जंगी स्वागत करण्यात आलं. याठिकाणी त्यांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केलं.



गोपीनाथ गडावर नतमस्तक; परळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, छत्रपतींना केले वंदन

# शेख वसीम यांनी मुस्लिम आरक्षण मागणीसाठी केलेला संघर्ष समाज विसरणार नाही - मुफ्ती अब्दुल्लाह कारमी

## जमियात उलमा - ए - हिंद च्या वतीने शेख वसीम यांचा सत्कार

बीड (प्रतिनिधी)

मुस्लिम आरक्षणाच्या मागणीसाठी बीड ते मुंबई मंत्रालय पायी प्रवास करून मागणीचे निवेदन देणाऱ्या मुस्लिम आरक्षण योद्धा शेख वसीम यांचा जमियात उलमा - ए - हिंद बीडच्या वतीने सत्कार करण्यात आला. सविस्तर वृत्त असे की, मुस्लिम आरक्षणाच्या मागणीसाठी बीड ते मुंबई मंत्रालय पायी प्रवास करून मागणीचे निवेदन देणाऱ्या मुस्लिम आरक्षण योद्धा शेख वसीम यांचा जमियात उलमा - ए - हिंद बीडच्या वतीने सत्कार कार्यक्रम बशीरगंज येथील कार्यालयावर सोमवार रोजी दुपारी दोन वाजता आयोजित करण्यात आले होते.



कार्यक्रमात सर्व राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांसह जमियात उलमा - ए - हिंद पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वसामान्य कुटुंबातील एक तरुण युवक शेख वसीम याने आपल्या स्व खर्चातून मुस्लिम आरक्षण मागणीसाठी बीड ते मुंबई मंत्रालय जवळपास पांशे किलोमीटरचा पायी प्रवास करून आरक्षण मागणीचे निवेदन दिले.शेक वसीम यांनी मुस्लिम आरक्षण मागणीसाठी केलेला संघर्ष हा मुस्लिम समाज विसरणार नाही असे जमियात उलमा - ए - हिंद चे बीड जिल्हा सदर मुफ्ती अब्दुल्लाह कस्मी यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मौलाना मोहम्मद साबीर यांनी केले तर तीलावत - ए - कुराण हाफीज मन्सूर यांनी केले व नातिया अशार काझी झफर यांनी सादर केले. तर आभार प्रदर्शन मुजताबा अहमद खान यांनी केले.यावेळी कार्यक्रमात काझी मुजीबर्रहेमान,शेख पाशाभाई,मोहम्मद रफीक बागवान,शेख अब्बास,सय्यद सदेक,हामेद चाऊस,मुहम्मद पाशा,शेख रईसे,सय्यद साजेद सह आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खालापुरी येथील पाच परस खोल विहिरीत पडलेल्या काळविटास जीवदान

शिरूर कासार ( प्रतिनिधी)

शिरूर कासार तालुक्यातील खालापुरी येथील शेतकरी लोंढे यांच्या शेतात भटक्या कुत्र्याच्या हल्ल्याने भयभीत झालेली काळवीटाची मादी त्यांच्या शेतात असलेल्या पाच परस खोल विहिरीमध्ये सैरभर पळत असताना पडली होती. या काळविटाच्या मादीस सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रामुळे नवजीवन मिळाले.

काल दिनांक २९जुलै रोजी खालापुरी येथील शेतकरी लोंढे यांच्या शेतामध्ये भटक्या कुत्र्याच्या हल्ल्याने सैरभर झालेली एक काळविटाची मादी विहिरीत पडली होती. या घटनेची माहिती सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रास खालापूरी गावचे सरपंच गणेश घोलप यांनी तात्काळ माहिती दिली . त्यानंतर ताबडतोब सर्पराज्ञीचे संचालक तथा मानद वन्यजीव रक्षक सिद्धार्थ सोनवणे व सर्पमित्र सुरेश गवळी हे घटनास्थळी दाखल झाले. विभागीय वन अधिकारी अमोल गर्कळ,वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्या काळवीटास विहिरीत उतरून बाहेर काढले. त्यानंतर लगेच त्या काळवीटास निसर्गात सोडून दिले .




# सावरगाव येथील दिगंबर मस्के यांचे दु:खद निधन

आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील सावरगाव येथील दिगंबर गोविंदराव मस्के वय वर्ष ६७ यांचे दीर्घ आजाराने शुक्रवार दिनांक २६ /७ /२०२४ रोजी नुकतेच दुःखद निधन झाले त्यांच्यावर सावरगाव येथील स्मशानभूमीत शोकाकुळ वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी राजकीय शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते ते मच्छिंद्रनाथ विद्यालयात क्लार्क म्हणून सेवेत होते त्यांचा स्वभाव मनमिळावू होता ते सतत सामाजिक धार्मिक क्षेत्रात सक्रिय असायचे त्यांच्या पश्चात डॉ, वसंत मस्के (मुलगा) गणेश मस्के (मुलगा) अमरसिंह मस्के (पुतण्या )मेनकापाठक (पुतणी ) सोनिया चितळे (पुतणी ) प्रा, म्हातारदेव मस्के



(पुतण्या)असा परिवार असून त्यांचा दशक्रिया विधी रविवार दिनांक ४/ ८ /२०२४ रोजी सकाळी साडेनऊ वाजता सावरगाव तालुका आष्टी जिल्हा बीड येथे होणार असून हभप उद्धव महाराज ढमाळ ( चितळी )यांचे प्रवचन होणार आहे

# ब्रम्हगावात साहित्यरत्न अण्णाभाउ साठे जन्मोत्सव मोठ्या उत्साहात

## कडुबाई खरात यांच्या गितांनी श्रोत्यांना केले मंत्रमुग्ध

माजलगाव (प्रतिनिधी)

शहरापासुन जवळच असलेल्या ब्रम्हगाव येथे उपसरपंच अनिलराधे कांबळे यांच्या पुढाकारातुन झालेल्या साहित्यरत्न अण्णाभाउ साठे सार्वजनिक जन्मोत्सव दि. २८ जुलै रोजी मोठ्या उत्साहात झाला. साठे जन्मोत्सवानिमीत्त शहरात प्रथमच प्रसिध्द गायिका कडुबाई खरात यांच्या गायनाच्या कार्यक्रमांनी सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सभापती नितीन नाईकनवरे यांच्या हस्ते करण्यात आले तर अध्यक्षस्थांनी मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष मिलींद आवाड यांची तर विशेष उपस्थितीत ओमप्रकाश शेटे, बाबुराव पोटभरे, विरेंद्र सोळंके, सुशिल डक, डॉ. सुरेश साबळे, आयोजक अनिल राधे कांबळे, शरद यादव, अमोल शेरकर, विठ्ठल तुपसौंदर, मधुकर कांबळे, कचरू कांबळे, भैय्या प्रधान, बबन खंडागळे, राजु थोरात, राज अर्जुन यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते




महापुरूषांच्या प्रतिमांचे पुजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी गायिका कडुबाई खरात यांनी अण्णाभाउ साठे यांच्या जिवनचरित्रावर एक से बढकर एक गाण्यांचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक अनिलराधे कांबळे, संयोजक अंजन कांबळे, जन्मोत्सव अध्यक्ष विक्रांत कांबळे, उपाध्यक्ष प्रविण कांबळे, सचिव संकेत कांबळे, सहसचिव युवराज कांबळे, कोषाध्यक्ष मनोज गायकवाड, सह कोषाध्यक्ष अमोल खंडागळे, विशाल कांबळे, मधुकर ताटे, राम घोडके, दत्ता कांबळे, पवन भिसे, अमित साळवे, आदेश पोवळे, अविनाश कांबळे, किरण कांबळे, प्रविण कांबळे, सौरभ कांबळे, मनोज कांबळे यांचेसह अनिल राधे मित्र परिवाराच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास दोन हजार पेक्षा अधिक महिला, पुरुष समाज बांधव उपस्थित होते.

# कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर पित्ताशयाची यशस्वी शस्त्रक्रिया

### मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, आ.पंकजाताई मुंडे यांच्याकडून तब्येतीची विचारपूस

**मुंबई (प्रतिनिधी)**

**राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर पित्ताशयाची यशस्वी शस्त्रक्रिया मुंबईतील सर एच.एन. रिलायन्स फाउंडेशन रुग्णालयात करण्यात आली आहे. त्यांना अनेक दिवसांपासून पित्त व पोटदुखीचा त्रास होता. मात्र सतत दौरे, सभा, कामकाज यामुळे प्रकृतीकडे दुर्लक्ष होत होते. मात्र आता पोटदुखीचा त्रास वाढल्याने शस्त्रक्रिया करावी लागली आहे.**



## प्रकृती स्थिर, आणखी ४-५ दिवस रुग्णालयातच विश्रांतीचा डॉक्टरांचा सल्ला

मुंबईच्या गिरगाव भागातील सर एच.एन. रिलायन्स फाउंडेशन रुग्णालयात मुंडेंच्या पित्ताशयावर (सरश्रश्र लश्ररववशी) डॉ.अमित मायदेव यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. बुधवारी (ता.२४) त्यांना दवाखान्यात दाखल करण्यात आले होते, त्यानंतर शुक्रवारी (ता.२६) त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. धनंजय मुंडे यांची प्रकृती आता स्थिर असुन, डॉक्टरांनी आणखी चार ते पाच दिवस रुग्णालयातच विश्रांती व पुढील उपचार घेण्याचा सल्ला दिला आहे.

दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी मुंडेंच्या तब्येतीची दूरध्वनीवरून विचारपूस करत काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. तसेच भाजप नेत्या आ.पंकजाताई मुंडे यांच्यासह माजी खा.डॉ.प्रीतमताई मुंडे यांनी देखील रुग्णालयात बंधू धनंजय मुंडे यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली आहे.

# एपीआय नारायण एकशिंगे व तहसीलदार संदीप खोमणे यांची वाळू तस्करांवर संयुक्त दबंग कारवाई



## तीन कोटीचा मुद्देमाल जप्त; वाळू तस्कराचे धाबे दणाणले

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे तसेच गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली होती की, चकलांबा पोलिस ठाणे हद्दीतील राक्षस भवन येथील नदीपात्रात सहा ते सात हवा वाळू भरण्या कामी येणार आहेत त्याप्रमाणे सापळा लावून सिताफिने गावकऱ्यांच्या मदतीने छापा टाकला असता. वाळू ची तस्करी करणे कामी आलेले सात हायवा पकडण्यात यश आले. सदरचे हायवा हे पोलीस संरक्षणात एसटी स्टँड गेवराई येथे लावून पुढील दंडात्मक कारवाई कामी तहसील कार्यालय गेवराई यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले.

सदरची कारवाई ही माननीय पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, उपवागीय पोलीस अधिकारी गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एक शिंगे, गेवराई तहसील चे तहसीलदार संदीप खोमणे साहेब तसेच टीम, पोलीस उपनिरीक्षक तांगडे, पोलीस हवालदार येळे, पोलीस शिपाई घोंगडे, पोलीस शिपाई सुरवसे, तसेच चालक गरजे आदींनी केली

# आरक्षणवाद्यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या आरक्षण बचाव यात्रेत सहभागी व्हा - बालाजी जगतकर

बीड (प्रतिनिधी)

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथून आरक्षण बचाव यात्रेला सुरुवात झाली आहे, पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष रेखाताई ठाकूर, तसेच राज्य कार्यकारणीतील नेते मंडळी येत आहे. आरक्षण बचाव यात्रा बीड जिल्ह्यात दाखल झाली असून, त्याची सुरुवात झाली आहे. ३० जुलै रोजी अंबाजोगाई येथील मुकुंदराज सभागृहात सभा झाल्या नंतर ती पुढे गेवराई येथे पोहोचणार दिनांक ३१ रोजी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष सर्व आरक्षणवादी व बहुजन समाजातील जनतेला मार्गदर्शन करणार आहेत.

आरक्षण बचाव यात्रेची उद्दिष्टे

जइउ चे आरक्षण वाचले पाहिजे. डउ, डढ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुप्पट झाली पाहिजे.जइउ च्या विद्यार्थ्यांना डउ, डढ प्रमाणे शिष्यवृत्ती जशीच्या तशी लागू झाली पाहिजे.डउ, डढ आणि जइउ ला पदोन्नतीत आरक्षण मिळाले पाहिजे,१०० जइउ आमदार निवडून आणणे.बनावट कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यात यावी. राज्यातील आणि देशातील



जातीची जातनिहाय जनगणना करावी.ही यात्रा जइउ, डउ, डढ चे सामाजिक आरक्षण, सामाजिक सुरक्षा व राजकीय सत्तासंपादन या क्षेत्रातील परिवर्तनासाठी आहे. आरक्षणावादी पिढीचे भविष्य धोक्यात न जाण्यासाठी राज्यतील डउ, डढ, जइउ च्या तमाम युवक महिला, व्यापारी कर्मचारी, शिक्षक व विचारवंत यांनी लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे. संविधान व आरक्षणावादी समुहाचे विरोधी असणारे सरकार व विरोधी पक्षांना



आरक्षणावादी वर्गाच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी विविध जइउ, डउ, डढ संघटनांनी पाठिंबा देऊन डश्रेुश्रू शक्तीचे दर्शन घडवावे ही यासाठी आरक्षण बचाव यात्रा येत आहे. जास्तीत जास्त संख्येने आरक्षणवादी व आरक्षणाचा लाभ घेणारे यांनी या आरक्षण बचाव यात्रेत सहभाग नोंदवा असे आव्हान वंचित बहुजन आघाडी चे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बालाजी जगतकर यांनी केले आहे.

# गोटेगावकरांचा मुंबईत झेंडा !

## ॲड. तुषार बचुटे LLB पदवी उत्तीर्ण

प्रतिनिधी ।बीड

मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात केज तालुक्यातील गोटेगाव येथील शेतमजुराचा मुलगा, अत्यंत गरिबीची हालाखीच्या परिस्थितीमध्ये विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन चरित्राच्या प्रेरणेतून शिक्षण घेऊन वकील बनण्याची जिद्द मनामध्ये बाळगून गोटेगावचे सुपुत्र ॲड. तुषार छत्रभुज बचुटे याने कष्ट करून शिक्षण घेत एलएलबी ही पदवी मिळविली आहे. ठाणे! जिल्ह्यातील भिवंडी या ठिकाणी

श्री इंद्रापाल बाबुराव चौघुले विधी महाविद्यालय या महाविद्यालयात चिकाटीने व जिद्दीने शिक्षण घेत गगनाला गवसणी घातली आहे.

प्राचार्य ॲड.गायत्री पाटील मॅडम तुषार यांचे कौतुक केले आहे. शिक्षण घेत असताना तुषारला बऱ्याच अडचणी आल्या त्याने जिद्द सोडली नाही. त्यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे प्रदेशाध्यक्ष महेश भारतीय, अक्षय गोटेगावकर, प्रीतम बचुटे, शुभम बचुटे , दीपक बचुटे यांचे तुषारला वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन मिळाले. गोटेगावचे सर्व ग्रामस्थ, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे प्रदेशाध्यक्ष महेश भारतीय यांनीही तुषारचे अभिनंदन, कौतुक केले आहे. गोरगरीब वंचित नागरिकांना न्याय मिळावा तसेच भारतीय संविधानाचा प्रचार व प्रसार करून गरीब मुलांना शिक्षणामध्ये मदत करणार असल्याचे ॲड. तुषार छत्रभूज बचुटे यांनी सांगितले.







न्यू हॉटेल राजवीर पाली येथे उद्घाटन प्रसंगी सदिच्छा भेट व सत्कार करते प्रसंगी न्यू हॉटेल राजवीर चे मालक प्रकाश वीर, वंचित आमचे नेते पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर, भीमदल प्रमुख एड.धम्मानंद वाघमारे, संपादक बालाजी जगतकर,लखन वीर, विशाल वाघमारे, प्रशांत वाघमारे, आदी उपस्थित होते.

# प्राथमिक शिक्षक बाबासाहेब इंगोले यांची लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून निवड

माजलगाव (प्रतिनिधी)

तालुक्यातील शिक्षक श्री बाबासाहेब चंद्रसेन इंगोले यांनी एमपीएससी तर्फे क्रीडा अधिकारी पदाची परीक्षा दिली होती या परीक्षेत परीक्षेत घवघवीत यश मिळवून लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे क्रीडा अधिकारी म्हणून निवड झाली आहे .परिस्थिती अनुकूल असताना यशाची टप्पे गाठणे सोपे काम परंतु नेमकी त्याच्या उलट प्रतिकूल परिस्थितीतून एकदा टप्पा हा इतरांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरक ठरू शकतो. टोकेवाडी तालुका वडवणी चे सुपुत्र श्री बाबासाहेब चंद्रसेन इंगोले यांनी जिल्हा क्रीडा कार्यालय लातूर येथे क्रीडा अधिकारी पदावर पदभार घेतल्याने त्यांच्या निवडीबद्दल जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे बाबासाहेब इंगोले यांच्याकडे अभ्यासू शिक्षक आदर्श शिक्षक म्हणून जिल्हा भरात पाहिले जाते अंगी जिद्द आणि चिकाटी होते त्यामुळे प्रत्येक ठिकाणी मेहनत करणे हा त्यांच्या जीवनाचा पाया राहिला आहे आज सुद्धा तेवढीच मेहनत करण्याची तयारी आहे हीच मेहनत आज यशाच्या शिखरावर लिहून ठेवली आहे माजलगाव तालुक्यातील शेलापुरी रेनापुरी वसाहत शाळेत तेरा वर्ष सेवा दिली तेथील विद्यार्थी नवोदय विद्यालय सैन्यामध्ये इंजीनियरिंग एमबीबीएस त्यांच्या मार्गदर्शनाला आणि प्रयत्नाने प्रवेशित झाली, मंगरूळ नंबर एक येथील लमाणतांडा शाळेतही गोरमाटी भाषा आत्मसात करून विद्यार्थ्यांना धडे दिले, विद्यार्थी घडवत असताना आहे स्वतःही घडले डीएड बीपीएड सेट नेट पदव्या घेऊन उच्चशिक्षीत झाले, असे विद्यार्थी प्रिय व समाज प्रिय शिक्षक क्रीडा अधिकारी झाल्याने क्रीडा क्षेत्राला नावलौकिक मिळवून देतील ,याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व शुभेच्छा होत आहे, या यशात आई-वडील पत्नी मुले भाऊ बहिणी आणि नातेवाईक यांची खंबीर साथ लाभली याबद्दल



त्यांनी त्यांचे मनपूर्वक आभार व्यक्त केले

# दिंडीतून बेपत्ता झालेल्या महिलेचा मृतदेह आढळला

आष्टी प्रतिनिधी

पंढरपूरला वारीसाठी जाणाऱ्या दिंडीतील एक भाविक महिला मुक्कामाच्या ठिकाणावरून बेपत्ता झाली पंधरा दिवसानंतर तिचा मृत देह सीना नदीपात्रात आढळला आशा बर्डे वय ४५ राहणार खरवंडी अशी मृत महिलेचे नाव आहे पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील खरवंडी येथील दिंडी पंढरपूरला जाताना आष्टी तालुक्यातील खुटेफळ गावात मुक्कामी होती यामध्ये ४५ वर्षे भाविक महिला तिथून बेपत्ता झाली होती आषाढी एकादशीनंतर दिंडीतील सर्व वारकरी आपापल्या घरी परतले मात्र महिला आली नसल्याने शोधाशोध सुरू झाल्यानंतर या दरम्यान सिना नदीपात्रात एक ४५ वर्षे महिलेचा मृतदेह आढळून आल्याची बातमी मिळताच नातेवाईकांनी अंभोरा पोलिसांशी संपर्क साधला सदर बेपत्ता महिलेचे वर्णन व मृत अवस्थेत आढळले वर्णन मिळते जुळते आढळून आल्याने नातेवाईकांनी शवविछेदन दरम्यान उपस्थित राहून ती महिला आशा जालिंदर बर्डे असल्याची खात्री पटवली त्यानंतर मुत्तदेह

नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला अशी माहिती अंभोरा पोलिसांकडून मिळाली आहे

# स्वामी विवेकानंद आश्रम शाळा याची मान्यता रद्द करा व त्या शिक्षकाला फाशी द्या. पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे

**दलित विद्यार्थ्यांचं हत्याकांड**

**अरविंद खोपे, वय -१३ इयत्ता सातवीत शिकणारा मुलगा. उराशी स्वप्न बाळगून आई वडिलांनी त्याला लातुर ला शिक्षणासाठी आश्रम शाळेत पाठविले, स्वामी विवेकानंद आश्रम शाळा,आपला मुलगा मोठा होऊन गरिबी दुर करेल हे स्वप्न आई वडिलांचे होते. आईवडील मिळल ते काम करून उपाजीविका भागवीत आहे. वडील मुंबई मध्ये कामासाठी माझा अरविंद मोठा होऊन, घराण्याच नाव उज्वल करेल या स्वप्नात वावरत होते.**

आश्रम शाळेत अरविंद ची परीक्षा आहे म्हणुन आई वडिलांनी पांगरी(परळी, जि-बीड)येथून अरविंद ला आश्रम शाळेत लातुर ला सोडले, काल दिनांक २९/०७/२०२४ रोजी अरविंद च्या आई वडिलांना शिक्षकांनी अरविंद च्या आई वडिलांना फोन केला. तुमच्या अरविंद च्या पोटला काहीतरी लागलंय त्याच्या पोटातून रक्त येताय, आश्रम शाळेपासून गाव दुर असल्यामुळ नातेवाईकांना तिथं पाठवलं.तर शिक्षकांनी सांगितलं अरविंद पळून गेला. दुपारी आई वडिलांना फोन धडाकाला अरविंद पळून गेला.अरविंद चा शोधाशोध घेत असताना आश्रम शाळेतील एका बाथरूम मध्ये मृत्यूदेह




लटकट होता, सुनियोजित कट असुन,अतिशय थंडागर पद्धतीने त्याला मरून टाकान्याय आलं. आणि आज सकाळी (३०/०७/२०२४) ०३:०० वाजता त्याच आश्रम शाळेतील शिक्षक गुपचूप अरविंद चा मृत्यूदेह खाली उतरून जंगलात तो मृत्यूदेह टाकण्यासाठी निघाले असताना, अरविंद च्या नातेवाईकांनी सकाळी ०३:०० वाजता त्या शिक्षकांना रांगेहाथ पकडले. लगेच शिक्षकांनी धूम ठोकून तिथून पळ काढला.

आपल्या पोट च्या मुलाचा मृत्यूदेह पाहून आई व नातेवाईक हतबल झालेत, आई घायमोकलुन रडत होती.माझा मुलाला दवाखान्यात न्या, माझ्या मुलगा कसा परत येईल अशी आई ची धडपड चालु होती, कुठं जाऊ! काय करू? माझा मुलगा कसा पुन्हा येईल! पोटच पोरग वेगवेगळी स्वप्न, जगण्याचा आधार,माझं आयुष्य माझा राजा गेला म्हनुन आई रडत होती.वडील मुंबई वरून रात्री निघाले.शिक्षक हा गुरु मनाला जातो, शिक्षेकानेच घात केला. हा घात जातीय भावानेतून केला अशी शंका निर्माण होत आहे. शिक्षकांने विदयार्थ्याला ठार मारलं...अरविंदला न्याय मिळाला पाहिजे, लातुर च्या पोलीस अधीक्षकांनी, लातूरचे पालकमंत्री असतील, जिल्हाधिकारी असतील यांनी लवकर भेट घटनास्थळी भेट देऊन अरविंद ला न्याय मिळुन देण्याची भूमिका घ्यावी..सकाळी ५ वाजल्यापासून ऑल इंडिया पँथर सेनेची संपूर्ण टीम आश्रम शाळेत दाखल झाली आहे...

कायद्याचा धाक राहिलेला नाही, लातुर हे जातीयतेचे, गुन्हेगारांचे केंद्र होत चालेल आहे. सत्ताधाऱ्यांच्या बळावर येते अन्याय वाढत चालले आहेत. कोणत्याही परिस्थितीत आम्ही आरोपीला सोडणार नाहीत. पोलिसांनी तत्काळ छडा लावला पाहिजे अन्यथा ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने महाराष्ट्रभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल. व गृहमंत्र्याच्या गाडीला आडवे झोपून न्याय मागितला जाईल.

# अखेर वंजारवाडी जिल्हा परिषद शाळा जनावरांच्या गोठ्यातुन पक्या ईमारतीत भरली

## प्रसार माध्यमांनी विद्यार्थ्यांना न्याय दिला:- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शाळे अंतर्गत येणाऱ्या वंजारवाडी वस्ती वरील जिल्हा परिषद शाळेला १० वर्षांपासून ईमारत नव्हती. वस्तीवरील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून उभारलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरत होती.मात्र दोन महिन्यांपूर्वी आलेल्या वादळ वा-याने पत्र्याचे शेड उडुन गेले.त्यामुळे शाळेतील मुलांना रोज झाडाखाली तर पाऊस आल्यावर जनावरांच्या गोठ्यात शिक्षण घ्यावे लागत असे या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दि.१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाला व शिक्षण विभागाला लेखी निवेदनाद्वारे दिला होता.यासंदर्भात सर्वच दैनिकानी मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी देत शाळेतील विद्यार्थ्यांना न्याय देण्याची मागणी केली होती.

गटशिक्षणाधिकारी यांनी स्वतः वंजारवाडी येथील विद्यार्थ्यांची पक्या ईमारतीत सोय केली

आज दि.२९ सोमवार रोजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी शिक्षण विभागाचे अधिकारी यांची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन वंजारवाडी शाळेच्या इमारतीसाठी




निधीची उपल्बध करून देण्याची आणि जनावरांच्या गोठ्यात भरणारी शाळा पक्या ईमारतीत स्थलांतरित करण्याचे आदेश दिले होते.त्याअनुषंगाने गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वडवणी बाबासाहेब उजगरे यांनी वंजारवाडी येथे प्रत्यक्ष भेट देत माजी शाळ व्यावस्थापन समिती अध्यक्ष बळीराम भानुदास मुंडे यांच्या आरसीसी इमारतीमध्ये भरविण्यात येत असल्याचे लेखी पत्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक) समग्र शिक्षा जिल्हा परिषद बीड यांना पाठवले आहे.प्रसार माध्यमांनी वंजारवाडी वस्तीशाळेवरील विद्यार्थ्यांना न्याय दिला:- डॉ.गणेश ढवळे

वंजारवाडी वस्तीशाळेवरील १ ते ५ इयत्तेतील २३ विद्यार्थी पटसंख्या असणाऱ्या विद्यार्थ्यांना ईमारती अभावी आणि लोकवर्गणीतून बांधण्यात आलेले पत्र्याचे शेड उडुन गेल्यावर झाडाखाली आणि पाऊस आल्यावर जनावरांच्या गोठ्यात शिक्षण घ्यावे लागत होते याबाबत सर्वच प्रिंट मिडीया , इलेक्ट्रॉनिक मिडिया , युट्यूबवर बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर अखेर जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाला जाग आली आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळाला.

# पाऊस शेताला पोटभर मात्र जलाशयात पाणी नाही घोटभर !

**प्रकल्पासाठी मोठ्या पावसाची प्रतीक्षा !**

शिरूर कासार(प्रशांत बाफना) : तालुक्यात यंदा प्रथम पासुनच तोलून मोलुन पाऊस पडत असल्याने शेतपिकाने शिवार बहरलेला दिसत असला तरी सिंदफना मध्यम प्रकल्पात मात्र अवघ्या तीन टक्कयांनी नव्या पाण्याची वाढ झाल्याचे सांगण्यात येते ,पावसापुर्वी या प्रकल्पात बारा टक्के पाणी साठा होता तर आता तो पंधरा टक्यावर गेला असल्याने अगदी तोकडी पाणीपातळी वाढली असुन हा प्रकल्प भरण्यासाठी प्रकल्प क्षेत्रात मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे .

मे जुन महिण्यातच पावसाचे आगमन झाले ,पेरणीलायक ओल असल्याने संपुर्ण क्षेत्रावर कापुस लागवड व अन्य पेरा केला गेला ,पाहिजे तसा पिकाला पाऊस अगदी तोलून मोलून होत गेल्याने सर्वच पिक बहरलेली दिसून येत आहे .सूर्यदर्शनाचा अभाव आणि सततची भुरभुर पिकाला क्षती पोहचू पहात असल्याने शेतकरी औषधी फवारणीवर जोर



**सिंदफना मध्यम प्रकल्पात अवघ्या तीन टक्क्यानी नव्या पाण्याची वाढ !**

देत आहे मात्र सकाळी फवारणी केली की दुपारी ती पावसाने धुवून काढली जात असल्याने काहिसे चिंतेचे सावट आहेच .

दोन दिवस दिली होती उघडीप !

शुक्रवार शनीवार थोडीसी उघडीप दिली होती ,शेतातील खुरपणीला वेग आला होता मात्र लागलीच रविवारी पावसाने खोडा घातला .सिंदफना मध्यम प्रकल्पाप्रमाणे ऊथळा ,घाटशिळा या प्रकल्पासह छोटे मोठे तलाव अजुनही तहानलेली असल्याचे दिसत आहे ,नद्या नाले देखील कोरडे ठाक असल्याने पाऊस पोटभर मात्र पाणी नाही घोटभर अशी अवस्था सध्या आहे ,मोठा पाऊस झाल्यास पाणी साठ्यात वाढ होईल असे बोलले जाते .सिंदफना मध्यम प्रकल्पाच्या वरील क्षेत्रात मोठा पाऊस होणे प्रकल्पासाठी गरजेचे असल्याचे शाखा अभियंता अविनाश मिसाळ यांनी सांगितले .

# शिव शारदा पब्लिक स्कूल येथे प्रीफेक्ट्स इन्व्हेस्टिचर सेरेमनीचे यशस्वी आयोजन

## युवा नेतृत्व रणवीर अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला कार्यक्रम

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : कोणत्याही कार्यात विविध प्रकारे सहकार्य व योग्य आयोजन केल्याने कार्याची यशस्विता व गुणवत्ता देखील वाढते, तर शालेय जीवनापासूनच प्रत्येक उपक्रम, स्पर्धा व अशाच अनेक गोष्टींचे आयोजन नियोजन करण्यास व त्यांना शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अधिकृतपणे विविध पदांचा कार्यभार सांभाळण्यासाठी निवडण्यात आलेले विद्यार्थी व त्यासाठी आयोजित करण्यात आलेला समारंभ म्हणजेच इन्व्हेस्टिचर सेरेमनी होय. या शैक्षणिक २०२४ - २५ वर्षासाठी विद्यार्थी प्रीफेक्ट्स स्थापना कार्यक्रमाचे अत्यंत उस्फूर्तपणे असे आयोजन दि. २९ जुलै २०२४ रोजी सीबीएसई शिव शारदा पब्लिक स्कूल, शिवाजीनगर, गढी येथे करण्यात आले.प्रीफेक्ट निवडीच्या अनोख्या सोहळ्यात गेवराई तालुक्याचे युवा नेतृत्व रणवीर ( काका )




पंडित प्रमुख उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे कर्तव्यदक्ष प्राचार्य कॅप्टन दास पिल्लई होते.

कार्यक्रमाच्या प्रसंगी शाळेचे प्राचार्य कॅप्टन पिल्लई यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते निवडलेल्या ४० प्रीफेक्ट्सना विविध पदांचा कार्यभार सांभाळण्याचे बॅजेस प्रदान करण्यात आले व चारही हाऊसचे विद्यार्थी व सर्व प्रतिनिधींना निष्ठा, सत्यता, सन्मान व या शाळेचे आदर्श उद्दिष्ट उच्चस्तरावर ठेवण्याची शपथ घेतली.यावेळी रणवीर ( काका ) पंडित यांनी नवनियुक्त प्रीफेक्ट्सशी उत्साहवर्धक शब्द सामायिक केले, त्यांना ध्येयाभिमुख जीवन जगण्याचे आणि त्यांच्या आकांशा साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी प्रस्तुत कार्यक्रमाचे व्यवस्थितरीत्या केलेले आयोजन, विद्यार्थ्यांची शिस्त या सर्वांची प्रशंसादेखील करत विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इरफान शेख सर यांनी केले तर सूत्रसंचालन अमृता पंडित मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन ड्युपीटी हेड गर्ल म्हणून निवडण्यात आलेली कु. सिद्धी कुटे हिने केले. कार्यक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. शालेय गीत आणि राष्ट्रगीताने नेतृत्व आणि जबाबदारीचा दिवस साजरा करण्याच्या उद्देशाने समारोप झाला.



# माजलगाव येथील राष्ट्रीय लोकअदालतीत दाखल प्रकरणे २०३ व दाखल पूर्व ११ निकाली

माजलगाव : प्रतिनिधी

जिल्हा विधी सेवा समिती माजलगाव व जिल्हा वकिल संघ माजलगाव यांच्या संयुक्त विद्यामाने लोकन्यायालयात दाखल प्रकरणे २०३ व दाखल पुर्व प्रकरणे ११ निकाली निघाली आहेत.या लोकन्यायालयात पाच पँनल ठेवण्यात आले होते मा.बी.जी धर्माधिकारी साहेब जिल्हा न्यायाधिश -१ माजलगाव यांनी पँनल क्रमांक १ वर काम पाहिलेश्री एस. डी.धनवट साहेब दिवाणी न्यायाधिश व.स्तर माजलगाव यांनी पँनल क्रमांक २ वर काम पाहिले,मा.बुधवंत साहेब सह दि.न्या.व.स्तर माजलगाव यांनी पँनल क्रमांक ३ वर काम पाहिले श्री आर ए सावंत साहेब दि.न्या. क.स्तर माजलगाव यांनी पँनल क्रमांक ४ वर काम पाहीले

श्रीमती आर एस गोसावी मॅडम यांनी पँनल क्रमांक ५ वर काम पाहीले यांच्या न्यायालयात नियमित दिवाणी दावा ३३१/२०२४ सोनाली अभय थावरे विरुद्ध वर्षा निवृत्ती थावरे मालकी हक्क घोषित डिक्लेरेशनचा दावा वादीचे वकील बी.एस.घोडे व प्रतिवादीचे विधीज्ञ डी.जी.जाधव वादी व प्रतिवादी यांच्यात संगनमताने तडजोड झालेली आहे दावा निकाली काढण्यात आलेला आहे प्रतिवादी हा अपंग असल्यामुळे न्यायाधिश श्रीमती गोसावी मॅडम यानी स्वतः प्रतिवादी यांच्याकडे जाऊन वादी व प्रतिवादी याच्यात तडजोड केली हे लोकन्यायालय यशस्वी करण्या साठी वकील संघाचे अध्यक्ष बि.आर.डक व वकील संघाचे सदस्य यांनी परिश्रम घेतले.

# शिक्षकाकडून लाच घेताना मुख्याध्यापक एसीबीच्या जाळ्यात

## गेवराई पंचायत समिती ट्रॅपची आठवड्यातली ही दुसरी घटना!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्यासाठी मुख्याध्यापकाने शिक्षकाकडे लाचेची मागणी केल्याची घटना गेवराईत उघडकीस आली आहे. या प्रकरणात २ हजार ७०० रुपयांची लाच घेताना मुख्याध्यापकाला एसीबीने रंगेहाथ पकडले आहे. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेवराई पंचायत समिती ट्रॅपची आठवड्यातली ही दुसरी घटना आहे.

भारत शेषेराव येडे (वय.५७, रा. मण्यारवाडी ता. गेवराई) असे लाचखोर मुख्याध्यापकाचे नाव आहे. २ हजार ७०० रुपयांची लाच स्विकारताना गेवराई शहरातील हॉटेल सोमवारी (दि.२९) रंगेहाथ पकडले आहे. तक्रारदार हे शिक्षक आहेत. त्यांना वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ अटी व शर्ती नुसार मान्य केले. संबंधित मुख्याध्यापक व




गटशिक्षण अधिकारी यांनी वरिष्ठ श्रेणी देय आहे किंवा कसे असे पत्र काढले होते.

तक्रारदार यांचे वरील वरिष्ठ श्रेणीचे बिल तयार करून ते बील गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती गेवराई आणि जिल्हा परिषद बीड येथून मंजूर करून देण्यासाठी एकूण बिलाची रक्कम २७ हजार रुपयांचे १० टक्क्यांची लाचेची मागणी केली. लाच स्विकारताना मुख्याध्यापकास यावेळी भारत येडे यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले असून याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे बीड पोलीस उपाधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक तथा सापळा अधिकारी शेख युनूस, सह सापळा अधिकारी गुलाब बाचेवाड, पोलीस अंमलदार, सुरेश सांगळे, भरत गारदे, अविनाश गवळी, अंबादास पुरी, निकाळजे, गणेश मेहेत्रे यांनी केली.

# डॉ महादेव मोहिते यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्रजी पवार) डॉ सेल च्या जिल्हा अध्यक्ष पदी निवड

## जिल्ह्यातील डॉक्टरांच्या पाठीशी मोठी ताकद उभी करणार-डॉ.मोहिते

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील मादळमोहि येथील रहिवाशी डॉ. महादेव मोहिते यांची नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्रजी पवार) डॉ सेल च्या जिल्हा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली, डॉ. मोहिते यांना लहान पणापासुन च सामाजीक क्षेत्रात कार्य करण्याची आवड आसल्याने ते गेल्या चार-पाच वर्षापासुन आरोग्य सेवा ग्रामीन भागात राहुन रुग्ण सेवा देत आहेत ,याच बरोबर ते सामाजिक क्षेत्रात व राजकिय क्षेत्रात आग्रेसर असतात, ते गेल्या चार वर्षापासुन डॉक्टर सेलच्या माध्यामातुन कार्य करत होते या कार्याची दखल घेऊन डॉ सेल चे प्रदेश अध्यक्ष डॉ सुनील जगताप सर व मा.शरदचन्द्रजी पवार साहेब यांच्या आदेशावरुन त्यांची डॉक्टर सेलच्या बीड जिल्हा अध्यक्ष पदाचे नियुक्ती पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्ष मा.जंयत पाटील साहेब यांच्या हस्ते देण्यात आले ,या वेळी बीडचे खासदार बजरंग सोनवने,




राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार साहेब गटाचे जिल्हाध्यक्ष संदिप भैय्या क्षीरसागर ,राष्ट्रवादी पदवीधर संघटनेचे अध्यक्ष डॉ, नरेन्द्र काळे सर,किसान आघाडी सेलच्या प्रदेश अध्यक्षा पुजाताई मोरे, युवक चे प्रदेश अध्यक्ष शेख महेबुब भाई यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये बीड जिल्हा दौ-यावर मा.जंयत पाटील साहेब आले आसता त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. त्यांची डॉक्टर सेलच्या बीड जिल्हा अध्यक्ष पदी निवड होताच त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला,त्यांना सामाजिक, शैक्षणिक, राजकिय व ईतर क्षेत्रातील मान्यवरांनी त्याना भेटुन शुभेच्छा व अभिनंदन केले .

बीड जिल्हात डॉक्टरांवर मोठया प्रमाणात हल्ले होत आहेत त्याच बरोबर हॉस्पिटलची देखील तोडफोड करुन मोठया प्रमाणात नुकसान केले जात आहे ,आशा घटना घडु नयेत म्हणुन डॉक्टरांच्या पाठीशी मोठी ताकद उभी करणार आहे , सर्व डॉक्टर हे प्रमाणीपणे रूग्णसेवा करत आसतात एखादया अंत्यत सिरियस पेंशटला वाचवू शकत नाहीत याचा राग धरुन पेंशटचे नातेवाईकाकडुन डॉक्टर वरती हाल्ले केले जातात आशा वेळी या पदाचा वापर डॉक्टररांच्या पाठीशी खंबीरपणे साथ देईल ,त्याच बरोबर बीड जिल्ह्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाला आहे पेंशटची आर्थिक लुट केली जाते हे थांबविण्यासाठी प्रमाणीक प्रयत्न करणार आहे ,बीड जिल्ह्यात डॉक्टर सेलचे संघटन मोठया प्रमाणात करणार आहे प्रत्येक तालुक्यात पदाधिकारी निमार्ण करणार ज्या डॉक्टर वर अन्याय झाला त्याना न्याय मिळवुन देण्यासाठी लढा उभा करणार व तसेच संघटनेचा वापर शरदचंद्रजी पवार साहेब यांचे हात बळकट करणार आहे..

-डॉ. महादेव मोहिते

# गेवराई तालुका सरपंच संघटनेची स्थापना

## अध्यक्ष कालिदास नवले, उपाध्यक्ष शितल साखरे तर सचिवपदी भास्कर हातागळे यांची निवड

गेवराई (प्रतिनिधी)

तालुक्यातील सर्व सरपंचांनाना सतत येणाऱ्या अडीअडचणी जाणीवपूर्वक होणाऱ्या तक्रारी, चौकशा यावर आळा बसवण्यासाठी व सरपंचाच्या विविध प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी गेवराई तालुका सरपंच संघटनेची स्थापना करण्यात आली आसून यामध्ये अध्यक्षपदी कालिदास नवले, उपाध्यक्ष शितल साखरे, तर सचिवपदी भास्कर हातागळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सोमवार दि.२९ रोजी पंचायत समिती सभागृहात झालेल्या बैठकीत ही या सरपंच संघटनेची स्थापना करून कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या बैठकीत तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतीच्या सरपंच यांना काम करताना अनेक अडचणी येत आहेत. यामध्ये प्रशासकीय स्तरावर होणारी अडवणूक, राजकीय द्वेषातून गावपातळीवर होणाऱ्या तक्रारी या तक्रारीतून लाभार्त्यावर होणारा अन्याय यासह अनेक अडचणींचा सामना गावचा प्रमुख असलेल्या सरपंचांना करावा लागत आहे. यासाठी संघटनात्मक बांधणी करून या




अडचणी सोडवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज लक्षात घेता या संघटनेची स्थापना केली. यामध्ये सर्वानुमते तालुकाध्यक्षपदी कालिदास नवले, उपाध्यक्षपदी शितल साखरे, सचिवपदी भास्कर हातागळे, कायदेविषयक सल्लागार म्हणून ऍड.नारायण शिंदे तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून पत्रकार भागवत जाधव यांची निवड करण्यात आली. तर सदस्य म्हणून निर्मला संभाजी आहेर, सोमित्रा आसाराम कबले, गोपीनाथ फलके, रितेश साबळे, नीता अंगद मैंद, पांडुरंग पवार, प्रल्हाद गायकवाड, रत्नमाला संतोष लाखे, योगेश रामभाऊ गाडे, वंदना शाम मुळे, बंडू नाना पवार, अरुणा नवले, श्रीराम उबाळे, ज्ञानेश्वर जाधव यांच्यासह आदींच्या निवडी करण्यात आल्या. ही संघटना कुठल्याही राजकीय पक्षाशी बांधील नसून यामध्ये सर्व पक्षीय सर्वच सरपंच सहभागी झाले आहेत. यावेळी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. दरम्यान यापुढे कुठल्याही सरपंचावर अन्याय झाला असेल तर सर्वांनी एकत्र येऊन त्यांच्या पाठीशी ही संघटना खंबीरपणे उभा राहील असा विश्वास तालुकाध्यक्ष कालिदास नवले यांनी व्यक्त केला.

# बीड न.प.कर्मचारी नलावडे यांना तात्काळ निलंबित करा - ऍड.धम्मानंद वाघमारे

बीड (प्रतिनिधी)

बीड नगर पालीकेमधील नगर रचना कार्यालयामध्ये नलवडे नामक महिला कर्मचारी यांनी अर्वाच्च भाषेचा वापर करून अपमानित केले आहे. तरी संबंधित न.प.कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करा.बीड नगरपालिकेमधील नगर रचना कार्यालयामध्ये कामाच्या वेळेमध्ये कर्मचारी गैरहजर होते. तसेच त्या विभागाच्या नलवडे नामक महिला कर्मारी यांना विचारणा केली असता त्यांनी तुमचे कामे मी करत नाही तुम्हाला जे काही करायचे आहे ते तुम्ही करा आम्ही कार्यालयात असुत किंवा नसुत तुम्ही काय आमचे मालक आहात का? तुम्ही सीओंकडे जा अथवा कलेक्टर यांच्याकडे जा आम्हाला काही फरक पडत नाही असे बोलून त्यांनी कार्यालयाच्या



बाहेर हाकलून लावले व अपमानित केले असून आपण संबंधित कर्मचाऱ्यावर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करावी अन्यथा दि.३१.०७.२०१४ रोजी नगर पालिका प्रशासनाच्या विरोधात भोंगळ कारभाराच्या विरोधात नगर पालिकेसमोर बेमुदत अर्धनग्न आंदोलन करण्यात येईल तरी कार्यवाही करावी अशी ऊँीी भीम दल प्रमुख ऍड.धम्मानंद वाघमारे यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

# सोन्नाथाडीचे सरपंच वंदना केरबा तपसे यांचे सरपंच पद राहणार कायम



माजलगाव (प्रतिनिधी)

तालुक्यातील सोन्नाथाडी येथील झालेल्या ग्रामपंचायतीचे सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जनतेमधून वंदना केरबा तपासे या सरपंच म्हणून निवडून आल्या असून त्या ग्रामपंचायत सोन्नाथाडी ता.माजलगाव जिल्हा बीड सरपंच पदाचा कार्यभार पाहत असून वंदना केरबा तपासे ह्या सरपंच म्हणून निवडून आल्यानंतर सरपंच वंदना केरबा तपासे यांनी गायरान जमिनीवर अतिक्रमण केलं असल्याने त्यांचे सरपंच पद तत्काळ रद्द करणेबाबत मां दिवाणी न्यायाधीश साहेब माजलगाव यांचे कोर्टात प्रकरण दाखल करण्यात आले होते परंतु सदर प्रकरणात सक्षा पुरावा चालू झाल्यानंतर प्रस्तूचे प्रकरण अर्जदार अचानकपणे काढून घेतल्याने सोन्नाथाडीचे सरपंच वंदना केरबा तपसे यांचे सरपंच पद कायम राहणार आहे सरपंच वंदना केरबा तपसे यांचे वतीने ड. व्हि.बी लवटे यांचे मार्गर्शनाखाली ड आर.के गवते यांनी काम पाहिले असून त्यांना ड एम. वि लांडगे यांनी सहकार्य केले

# सत्यशोधक अण्णा भाऊ साठे जंयती निमीत्त, जग बदल घालूनी घाव, सांगुनी गेले मज भिमराव, मशाल क्रांती मार्च

## बहुसंख्येने सहभागी व्हा - विनोद (दादा) हातागळे

बीड (प्रतिनिधी)

सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमीत्त बीड शहरात ०१ ऑगस्ट २०२४ सकाळी १०.०० वा. डॉ. बाबासाहेब आबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्या पर्यंत जग बदल बालुनी घाव, मज सांगुनी गेले भिमराव मशाल क्रांती मार्च काढण्यात येणार आहे तरी बीड शहरातील तमाम जनतेने सहभागी व्हावे असे आवाहन बलभीम नगर , पेठ बीड जयंती उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष विनोद दादा हातागळे



यांनी केले आहे.प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांनी आपले सारे जिवन सामान्य गोरगरीब जनतेल जागृत करण्यासाठी घालवले, अनेक संघर्ष केले या मध्ये आण्णाभाऊ साठे यांना जातीवादाचे चटके सहन करावे लागले, याच त्यांच्या शेवटच्या काळा त्यांनी फकिरा ही कांदबरी लिहली व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेला अर्पण केली व संदेश दिला की जग बदलण्याची ताकद फक्त डॉ. आंबेडकरांच्या विचारधारेत आहे, जो पर्यंत जातीय व्यवस्था उध्वस्त होत नाही, तो पर्यंत दलित जनतेवरील अन्याय दुर होणार नाहीत, म्हणुन जातीय व्यवस्थेवर घाव घाला असा संदेश सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांनी दिला, याच संदेशाचा प्रचार आणी प्रसार व्हावा या उद्देशाने या क्रांती मशाल मार्च चे आयोजन करण्यात आले आहे, तरी बहुसंख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सत्यशोधक अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती बलभीमनगर , पेठ बीड यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT